अनुसंधानम् वृत्तिरस्तु।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद
नियतकालिक
(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

भारतीय सौर माघ-चैत्र १९३९

जानेवारी-मार्च २०१८ / खंड ४१, अंक ४

Scanned with OKEN Scanner

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

www.marthpari.org

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452 जाने.-फेब्रु.-मार्च २०१८ / खंड ४१ / अंक ४

## अनुक्रमणिका

१. रामचंद्र रसाळ : महाराष्ट्रातील शेती - एक दृष्टिक्षेप ........ २८७

२. केदार मारूलकर :
स्वप्नात रंगवलेला राजकीय अर्थसंकल्प .................. ३०१

३. संतोषकुमार ब. यादव :
आर्थिक पाहणी अहवाल २०१७-१८ : प्रमुख घडामोडी ३०६

४. शशिकांत चंद्रकांत आंडगे : आभासी बिटकॉइन : एक गूढ ३२०

५. धनश्री धनंजय आंबेकर : आदिवासी समाजविकासाच्या
शासकीय सामाजिक विकास योजनांचा आढावा ............... ३२८

६. मुलाणी महमंदरफीक उमराव : 'भीमथडी जत्रा' या
विपणनाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण ........... ३३५

७. रवींद्र बा. शेंडे, हितेश म. दडमल :
भारताच्या अतिरिक्त लोकसंख्येचे रूपांतरण
पर्याप्त लोकसंख्येत .................................. ३४३

८. नीता सुधाकर वाणी : राष्ट्रीयीकृत बँकांमधील एन.पी.ए.चे
वाढते चिंताजनक प्रमाण आणि बँकांची तत्वे -
चिकित्सक अध्ययन ........................................ ३४८

९. मंजूषा मुसमाडे : पुस्तक परिचय ........................ ३५७

१०. शि. ना. माने : वाद-प्रतिवाद ................................. ३६४

११. जे. एफ. पाटील : अर्थ शब्दांची वाट पाहे .................. ३६६

१२. निबंध लेखकांसाठी विषयाची रुपरेषा, ४२ वे अधिवेशन
दि व्यं. जहागीरदार : कार्ल मार्क्स : काल, आज व उद्या . ३६७
जे. एफ. पाटील : कृषी मूल्य व व्यय आयोग : एक चिकित्सक
अध्ययन ................................... ३७१
सुभाष पाटील : महाराष्ट्रातील सामाजिक संरचना : वास्तव प्रश्न
व उपाय ................................... ३७३

प्रमुख संपादक
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

सहाय्यक संपादक
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय,वारणा नगर)

सल्लागार मंडळ
(२०१५-१८)
तेजस्विनी मुडेकर
अरुण पिसे
राजेंद्र गव्हाळे
विजय भोपाळे

संपादकीय पत्रव्यवहार
राहुल शं. म्होपरे
विद्यापीठ क्वार्टर नं. डी-३४,
सायबरसमोर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ता. करवीर, जि. कोल्हापूर
पिन : ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

लेखातील मते लेखकांचीच

Scanned with OKEN Scanner

# भारताच्या अतिरिक्त लोकसंख्येचे रूपांतरण पर्याप्त लोकसंख्येत

**रवींद्र बा. शेंडे †**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा.

**हितेश म. दडमल††**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
रा.तु.म.नागपूर विद्यापीठ, नागपूर.

भारतात २०११ च्या जनगणनेनुसार, १२१ कोटी लोकसंख्या आहे. भारताचा लोकसंख्येत जगात दुसरा क्रमांक लागतो. सध्या अस्तित्वात असलेली लोकसंख्या नि:संकोचपणे अतिरिक्त आहे. या अतिरिक्त लोकसंख्येचे पर्याप्त लोकसंख्येत रूपांतरण करण्याचा प्रयत्न भारतात सुरू आहे. आज जगातील जवळपास सर्वच देश पर्याप्त लोकसंख्येच्या प्रयत्नात आहेत. भारताचासुद्धा याला अपवाद नाही.

माल्थस यांनी सांगितलेले विचार त्या काळात जरी दुर्लक्षित झाले असले, तरी आज आणि भविष्यातील अडचणी लक्षात घेऊन लोकसंख्येच्या नियोजनाची गरज आहे. आर्थिक विकासावर अनेक घटकांचा परिणाम होतो त्यामध्ये नैसर्गिक साधनसामग्री, तंत्रज्ञान, भांडवल, बाजाराची अपूर्णता दूर करणे, संरचनात्मक बदल, संघटन आणि कार्यक्षम उपक्रम, वित्तीय स्थैर्य, कार्यक्षम आणि स्थिर सरकार, प्रगतिशील सामाजिक, सांस्कृतिक वातावरण, सामाजिक न्याय, धार्मिक दृष्टिकोन, मनोवैज्ञानिक घटक, कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती इत्यादींचा समावेश होतो. या सर्व घटकांना अधिक गतिशील करण्याची क्षमता पर्याप्त लोकसंख्या या घटकात आहे.

अतिरिक्त लोकसंख्येच्या साहाय्याने आर्थिक विकास साधने म्हणजे 'पूर आलेल्या जमिनीवर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने घर बांधल्यासारखे आहे'; तसेच अतिरिक्त लोकसंख्येमार्फत विकास साधणे म्हणजे तारेवरची कसरत आहे. केव्हा अर्थव्यवस्थेचा तोल जाईल, हे सांगता येत नाही. त्यासाठी पर्याप्त लोकसंख्या हाच आर्थिक विकासाचा अंतिम स्रोत आहे. हेच समीकरण भारतासारख्या देशाला वापरणे गरजेचे आहे. स्वातंत्र्यानंतरच्या १०० वर्षांत 'पर्याप्त लोकसंख्या' पाहायला मिळेल, असा आशावाद १५ व्या जनगणनेच्या घोषवाक्यावरून (आपली जनगणना - आपले भविष्य) नक्की करता येईल. कारण, बऱ्याच कामांना सरकारच्या मदतीची गरज नसते. उदा. रस्त्यावरून जात असताना पाण्याच्या नळाची तोटी सुरू असल्यास ती बंद करणे अशी कृती लोकसंख्येशी नक्कीच जुळलेली आहे. शासनाची उदासीनता दूर, 'शक्यतो उशिरा लग्न आणि हम दो हमारा एक' हा नारा हे वर्जन वापरल्यास भारतात 'पर्याप्त लोकसंख्या' निर्माण होईल, यात शंका नाही.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) लोकसंख्यावाढीचे फायदे, संधी आणि संभ्रम (ऐतिहासिक आधार) यांचा अभ्यास करणे.

२) पर्याप्त लोकसंख्या म्हणजे काय, याचा अभ्यास करणे.

† आजीव सभासद क्र. १७५९, भ्रमणध्वनी : ९७६५९२६४५४, ई-मेल : shende.ravindra3@gmail.com
†† आजीव सभासद क्र.१६७९, भ्रमणध्वनी : ९९२१८५९१९२ ई-मेल : hiteshdadmal@gmail.com

३) लोकसंख्या संक्रमण सिद्धान्ताचा अभ्यास करणे.

४) २०११च्या जनगणनेच्या ठळक वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

५) कुटुंब नियोजनातील अनेक गैरसमजुतींचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीते**

१) पर्याप्त लोकसंख्या आर्थिक विकासाचा अंतिम स्रोत आहे.

२) अतिरिक्त लोकसंख्येमार्फत आर्थिक विकास साधणे म्हणजे तारेवरची कसरत आहे.

३) अतिरिक्त लोकसंख्येच्या प्रश्नाशी कोट्यवधी लोकांचे भविष्य निगडित आहे.

**संशोधनपद्धती**

पर्याप्त लोकसंख्येसाठी जवळपास सर्वच देश प्रयत्नात असून, भारताचासुद्धा याला अपवाद नाही. पर्याप्त लोकसंख्येचा विचार प्रस्तुत शोधनिबंधातून करीत असताना संपूर्ण माहिती दुय्यम स्रोतामधून घेतलेली आहे. यात विविध संदर्भ पुस्तके, शासनाचे अहवाल, जनगणना-२०११, मासिके, इंटरनेट व वर्तमानपत्रे इत्यादींचा आधार घेऊन विषयाचे विश्लेषण केले आहे.

**पर्याप्त लोकसंख्या म्हणजे काय?**

प्रा. कॅनन यांच्या मते, विकासाला मदत करण्याच्या दृष्टीने लोकसंख्येचे तीन भागांत वर्गीकरण करता येते. १) जी लोकसंख्या आर्थिक विकासाला अडथळा निर्माण करते, त्या लोकसंख्येला 'अतिरिक्त लोकसंख्या' असे म्हणतात. २) जी लोकसंख्या आर्थिक विकासाला मदत करते, त्या लोकसंख्येला पर्याप्त लोकसंख्या असे म्हणतात. ३) जी लोकसंख्या युक्त लोकसंख्येपेक्षा कमी आणि साधनांचा परिपूर्ण उपयोग करुन घेऊ शकत नाही, ती न्यून लोकसंख्या होय. आज जागतिक अर्थव्यवस्थेत पर्याप्त लोकसंख्येचा विचार करणे गरजेचे ठरत आहे.

**वाढत्या लोकसंख्येचे फायदे, संधी आणि संभ्रम : (ऐतिहासिक आधार)**

लोकसंख्यावाढ ही विकसनशील देशांच्या आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळा ठरेल, ही भीती व्यर्थ आहे, असे म्हटले जाते व त्यासाठी काही ऐतिहासिक गोष्टींचा आधार आहे.

१) लोकसंख्यावाढ होत असतानाच आर्थिक विकास वेगाने झाल्याची अनेक उदाहरणे विकसित देशांच्या इतिहासात सापडतात. उदा. औद्योगिक क्रांतीच्या काळातच इंग्लंडची लोकसंख्या दुप्पट झाली होती; शिवाय काही युरोपीय देशांमध्ये लोकसंख्या वाढत असतानाही जो आर्थिक विकास झाला, त्याला अंशतः वसाहतीचे आर्थिक शोषणही कारणीभूत होते, हे नाकारता येणार नाही.

२) माल्थसच्या काळापासूनचा इतिहास पाहिला, तर अनेक वेळा लोकसंख्यावाढीमुळे मानवजातीवर संकट कोसळेल व जगव्याप्त दुष्काळ येईल, अशी भीती व्यक्त केलेली दिसते; परंतु मानवाने आपल्या बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर तांत्रिक प्रगती करून या समस्येवर मात केली आहे.

हा आशावाद अल्पकालीनदृष्ट्या संपूर्ण जगाच्या बाबतीत खरा असला, तरी कोणत्याही एका देशाला या आधारावर लोकसंख्येच्या समस्येकडे दुर्लक्ष करता येणार नाही. थोडक्यात, लोकसंख्यावाढीचे फायदे ऐतिहासिकदृष्ट्या खरे असले, तरी दीर्घकालीनदृष्ट्या तो भ्रम आहे, यासाठी पर्याप्त लोकसंख्येच्या दृष्टीने लोकसंख्येच्या नियंत्रणाची गरज आहे.

**लोकसंख्येच्या संक्रमणाचा सिद्धान्त आणि भारत**

विकसित देशांच्या अनुभवांवर आधारित लोकसंख्येच्या संक्रमणाचा सिद्धान्त आहे. लोकसंख्येच्या संक्रमणाच्या सिद्धान्ताच्या तिसऱ्या



Scanned with OKEN Scanner

अवस्थेत पोहचणे आवश्यक आहे. आज भारत या सिद्धान्ताच्या दुसऱ्या अवस्थेत बऱ्याच कालावधीपासून अडकलेला आहे. आर्थिक विकासामुळे लोकसंख्येतील बदलाच्या तीन अवस्था निर्माण होतात, त्या पुढीलप्रमाणे-

**१) पहिली अवस्था - जन्म-मृत्यूचे उच्च दर**

आर्थिक विकासाच्या अभावामुळे जन्मदरही मोठा असतो आणि मृत्यूदरही मोठा असल्यामुळे लोकसंख्यावाढीचा दर जवळपास शून्य असतो. 'मुले हा वृद्धापकाळाचा विमा' अशा प्रकारच्या जन्म व मृत्यूबाबत अनेक गैरसमजुती उपस्थित असतात. माल्थसचा लोकसंख्येबाबतचा सिद्धान्त पहिल्या अवस्थेचा प्रमुख आधार आहे.

**२) दुसरी अवस्था -जन्मदर उच्च आणि मृत्यूदर कमी :**

आर्थिक विकासाला सुरुवात झाल्यानंतर मृत्युदर कमी करणाऱ्या बऱ्याच गोष्टी निर्माण होऊन, त्याचा वापर होतो. परंतु, जन्मदर कमी करण्यासाठी अनुकूल वातावरण असतानाही चुकीच्या गैरसमजुती मोठ्या असल्यामुळे जन्मदर पाहिजे तसा कमी होत नसल्यामुळे लोकसंख्यावाढीचा दर मोठा राहतो.

आज विकसित देश लोकसंख्येच्या संक्रमणाच्या सिद्धान्ताच्या तिसऱ्या अवस्थेत आहेत आणि भारत या सिद्धान्ताच्या दुसऱ्या अवस्थेत मागील ७० वर्षांपासून अडकलेला दिसतो. या अतिरिक्त लोकसंख्येला 'शक्यतो उशिरा लग्न आणि हम दो हमारा एक' हे व वापरल्यास भारतात पर्याप्त लोकसंख्या तयार होईल; तसेच रोडानच्या जोराचा धक्का सिद्धान्ताची (लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून) मदत मिळाल्यास पर्याप्त लोकसंख्या तयार होईल.

**३) तिसरी अवस्था - जन्मदर कमी आणि मृत्युदर कमी**

आर्थिक विकासाला गती प्राप्त झाल्यानंतर मृत्युदर कमी करणाऱ्या विविध सोयी पर्याप्त प्रमाणात निर्माण होऊन, त्यांचा वापर होतो. तसेच, जन्मदर कमी करण्यासाठी अनुकूल वातावरण उदा. अतिरिक्त लोकसंख्येचा त्रास, स्त्री श्रमशक्तीचा वापर, बऱ्याच गैरसमजुती शून्य होऊन, त्यांचा वापर पूर्णपणे होत असल्यामुळे जन्मदर व मृत्युदराच्या संतुलनाला मदत करून पर्याप्त लोकसंख्या निर्माण करते. लोकसंख्यावाढीचा दर पर्याप्त लोकसंख्येला सदैव मदत करीत असतो. विकसित देश मागील बऱ्याच वर्षांपासून या तिसऱ्या अवस्थेचा आनंद घेत आहेत. भारतासारख्या देशाला निश्चितच ही अवस्था दीपस्तंभासारखी मदत करत आहे.

**भारताच्या लोकसंख्येची ठळक वैशिष्ट्ये (२०११च्या जनगणनेनुसार)**

भारतात १८७२ पासून जनगणनेला सुरुवात झाली असून, २०११ ची जनगणना १५ वी असून, स्वतंत्र भारताची ७ वी जनगणना आहे. या जनगणनेचे 'आपली जनगणना-आपले भविष्य' हे घोषवाक्य आहे. वर्ष २०११ च्या जनगणना अहवालातील प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येईल.

| जनगणना वर्ष | लोकसंख्या (कोटींमध्ये) | दशकातील वाढ (प्रतिशत) |
|---|---|---|
| १८९१ | २३.६० | --- |
| १९०१ | २३.८४ | --- |
| १९११ | २५.२१ | + ५.७५ |
| १९२१ | २५.१३ | - ०.३१ |
| १९३१ | २७.९० | + ११.०० |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| १९४१ | ३१.८७ | + १४.२२ |
| १९५१ | ३६.११ | + १३.३१ |
| १९६१ | ४३.९२ | + २१.६४ |
| १९७१ | ५४.८२ | + २४.८० |
| १९८१ | ६८.३३ | + २४.६६ |
| १९९१ | ८४.६४ | + २३.८७ |
| २००१ | १०२.८२ | + २१.५४ |
| २०११ | १२१.०२ | + १७.६४ |

*स्रोत - भारतीय अर्थव्यवस्था, प्रतियोगिता दर्पण*

| | | |
|---|---|---|
| १) एकूण लोकसंख्या | - | १,२१,०१,९३,४२२<br>(पुरुषांची संख्या - ६२,३७,२४,२४८ - ५१.५४%)<br>(महिलांची संख्या - ५८,६४,६९,१७४ - ४८.४६%) |
| २) स्त्री पुरुष (२०११) | - | भारत ९४० : १०००<br>जग ९३७ : १०००<br>केरळ १०८४ : १०००<br>बिहार ८७७ : १००० |
| ३) ०-६ वयोगटातील स्त्री पुरुष प्रमाण | - | भारत ९१४ : १००० |
| ४) जागतिक लोकसंख्येत भारताची लोकसंख्या | - | १७.५०% |
| ५) दशकातील वृद्धिदर | - | १७.६४% (जन्मदर-२१.८%) (मृत्युदर-०७.१%) |
| ६) सर्वाधिक लोकसंख्या - उत्तरप्रदेश | - | १९, ९५, ८१, ४७७ - १७.४९% |
| ७) सर्वात कमी लोकसंख्या - सिक्कीम | - | ६.०८ लाख |
| ८) लोकसंख्येची घनता | - | भारत - ३८२ व्यक्ती प्रती वर्ग किमी<br>जग - ४५ व्यक्ती प्रती वर्ग किमी |
| ९) साक्षरता | - | भारत - ७४.०४%<br>पुरुष - ८२.१४%<br>स्त्रिया - ६५.४६% |
| १०) सरासरी आयुर्मान | - | ६५ वर्ष |
| ११) ग्रामीण-शहरी लोकसंख्या | - | ग्रामीण - ८३.३१ कोटी (६८.८४%)<br>शहरी ३७.७१ कोटी (३१.१६%) |
| १२) वयोगटानुसार लोकसंख्येची वर्गवारी | - | १) ०-१४ वर्षे = २८.४८%<br>२) १५-६४ वर्षे = ६३.३८%<br>३) ६५ वरील = ८.१४% |
| १३) खर्च-प्रती व्यक्ती | - | १८.१९ रुपये |

*स्रोत : जनगणना - २०११*



Scanned with OKEN Scanner

भारताची लोकसंख्या नि:संकोचपणे अतिरिक्त आहे. ग्रामीण व शहरी लोकसंख्येत जो मोठा फरक निर्माण होत आहे, त्यावर ग्रामीण उद्योगीकरणामार्फत आळा घालणे आवश्यक आहे, नाही तर ग्रामीण सर्वसमावेशक संस्कृती नष्ट होईल. साक्षरतेत झालेली वाढ समाधानकारक असून, अस्तित्वात असलेल्या साक्षरतेकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. स्त्री पुरुष प्रमाण बिघडलेले असून, ० ते ०६ वयोगटातील स्त्री पुरुषांचे प्रमाण खूपच धोकादायक आहे. यावर आळा घालण्याकरिता 'She for He' अशा कार्यक्रमाची आवश्यकता आहे. या अतिरिक्त लोकसंख्येला 'शक्यतो उशिरा लग्न आणि 'हम दो हमारा एक' हे वर्जन वापरल्यास भारतीय अर्थव्यवस्थेत पर्याप्त लोकसंख्या निर्माण होऊन भारतीय अर्थव्यवस्था निश्चितपणे पूर्ण विकसित अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाईल, अशी मोठी उपलब्धी आपणा सर्वांना मिळवायची आहे व यासाठी अस्तित्वात असलेल्या सर्व योजना उदा., नवीन लोकसंख्या धोरण-२०००, राष्ट्रीय आरोग्य मिशन - २००२ आणि लोक सहकार्य यात अनुकूल बदल करणे आवश्यक आहे.

### कुटुंब नियोजनाबद्दल गैरसमजुती आणि उपाय

अतिरिक्त लोकसंख्येमुळे महिलांचे आरोग्य धोक्यात येत आहे. महिला श्रमशक्ती वाया जात आहे. अशा विविध कारणांमुळे कुटुंब नियोजनातील गैरसमजुती दूर होणे आवश्यक आहे. कुटुंब नियोजनात पुढील गैरसमजुती आहेत.

१) कुटुंब नियोजन केल्यामुळे पुरुषांची लैंगिक शक्ती कमी होते.
२) म्हशीला आपल्या शिंगांचे कधी ओझे होत नसते.
३) मला बाळंतपणाचा कोणताही त्रास होत नाही.
४) फॅमिली प्लॅनिंग केले आणि ते अयशस्वी झाले तर? गर्भ राहिला तर? नवरा कबूल करेल काय?
५) कुटुंब नियोजन केल्यानंतर ते अयशस्वी झाले व पुढे गर्भ राहिला, तर तुझाच कुणातरी परपुरुषाशी संबंध आला असेल, हा गर्भ माझा नाहीच, असे नवरा म्हणू शकतो.
६) आपल्या पत्नीने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली आणि भविष्यात अन्य पुरुषांशी तिचा संबंध आला, तर ते कसे कळणार? यासाठी पुरुष संमती देत नाही.
७) कुटुंब नियोजनानंतर 'तलाक' मिळाला तर काय? नंतर बिनफळाच्या झाडाला कोणीही पाणी घालत नाही.

या गैरसमजुतीत तथ्य काही नाही, हा सर्व भ्रम आहे. कुटुंब नियोजन कार्यक्रमाला लोकांचे सहकार्य मिळाल्यास 'पर्याप्त लोकसंख्या' तयार होण्यास कोणताही वेळ लागणार नाही. लोकसंख्या नियंत्रणासाठी 'कुटुंब नियोजन' हा सर्वात प्रभावी मार्ग आहे, त्याचा वापर अधिक होत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. तसेच, जोडप्यापर्यंत कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम पोहोचविणे म्हणजे तात्पुरती मलमपट्टी आहे. या सर्व कार्यक्रमाबद्दल तरुणांनाही जागृत करणे आवश्यक आहे.

### समारोप

लोकसंख्येच्या प्रश्नाचा विचार जवळजवळ प्रत्येक कालखंडात विविध क्षेत्रांतल्या विचारवंतांनी केला आहे. लोकसंख्यावाढीचे विविध फायदे ऐतिहासिकदृष्ट्या सांगण्यात येत असले, तरी दीर्घकालीनदृष्ट्या ते फायदेशीर नाहीत. भारतात अतिरिक्त लोकसंख्या नि:संकोचपणे आहे. भारतातील ही अतिरिक्त लोकसंख्या नष्ट करण्यासाठी 'शक्यतो उशिरा लग्न आणि हम दो हमारा एक' हे वर्जन वापरल्यास पर्याप्त लोकसंख्या निश्चितपणे तयार होईल, हे सत्य आहे.

२०११च्या जनगणनेच्या वैशिष्ट्यावरून दुरुस्तीसाठी विविध संधींची ओळख होते. प्रत्येक

जनगणनेतून दुरुस्तीसाठी विविध संधी निर्माण होतात. या संधी ओळखल्यास भारत लोकसंख्या संक्रमण सिद्धान्ताच्या तिसऱ्या अवस्थेत लवकर पोहोचेल.

कुटुंब नियोजनात असलेले गैरसमज दूर करून जोडप्यांसोबतच युवकांपर्यंत कुटुंब नियोजन कार्यक्रमाबद्दल जागृती निर्माण केल्यास लोकसंख्येबाबत चांगल्या उपलब्धी निश्चितपणे तयार होतील. जगात सर्वच देश पर्याप्त लोकसंख्येच्या प्रयत्नात आहेत. भारताचासुद्धा याला अपवाद नाही. जगातील लोकांच्या सहकार्याचा भाग वाढल्यास जागतिक अर्थव्यवस्थेला पर्याप्त लोकसंख्या अधिक सुदृढ करेल, असाच आशावाद बाळगणे संयुक्तिक आहे.

## संदर्भ


१) *अर्थसंवाद खंड २ रा*, अंक-१ (१९७८-७९) मराठी अर्थशास्त्र परिषद, पुणे

२) दत्त व सुंदरम, *भारतीय अर्थव्यवस्था*, प्रकाशक एस चान्द

३) सुलताना रजिया, *बुरख्याआडचं जग*, दै. पुण्यनगरी (२०१७)

४) www.census २०११


◆

## 'अर्थसंवाद'च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (2335) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२. **शोधनिबंधाची प्रत अथवा सीडी पोष्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाइल व त्याचीच PDF केलेली फाइल) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.** पेपरबरोबर संपादकांना शोधनिबंध पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. शोधनिबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. शोधनिबंधात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पुढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, (२०१०). (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)



Scanned with OKEN Scanner